साप्ताहिक

''एकच ध्येय... एकच आवाज''

PRGI No. MAHMAR / 25 / A5304
पोस्ट परवाना नं. : DHL/642/2026-28

# प्रजा न्याय

संपादक – संजय अण्णा कुसळकर

Mob. : 9422798093 / 9028136953
Email - kusalkars@gmail.com
prajanyay@gmail.com

वर्ष-१ले | अंक ३८ वा | सोमवार, दि. ०५/१०/२०२६ ते दि. ११/१०/२०२६ | पाने ४ | किंमत ३ रुपये

## सिमेंट रस्ते थांबवा; पाणी, शेतरस्ते आणि रोजगाराला पैसा द्या दुष्काळी उपाययोजनांसाठी निधीचे पुनर्नियोजन; मृत बंधारे पुन्हा जिवंत करण्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश

### सिंचन प्रकल्पांचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर; दर गुरुवारी प्रशासनाच्या कामकाजाचा आढावा घेणार-पालकमंत्री जयकुमार रावल




धुळे (जिमाका) – दुष्काळाच्या काळात चार सिमेंट रस्ते कमी झाले तरी चालतील; मात्र शेतात जाण्यासाठी रस्ता, पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा आणि शेतकरी–शेतमजुरांच्या हाताला काम मिळालेच पाहिजे, अशी स्पष्ट भूमिका राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मांडली. धुळे जिल्ह्यात उपलब्ध निधीचा प्राधान्यक्रम बदलून जलसंधारण, शेतरस्ते, पाणंद रस्ते, पाणीपुरवठा आणि रोजगाराच्या कामांकडे निधी वळविण्याचे निर्देश त्यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी कृषी, पशुसंवर्धन, पाणीपुरवठा, जलसंधारण, महावितरण, वन विभागासह दुष्काळाशी संबंधित ११ विभागांच्या तयारीचा आढावा घेतला. शासनाचे निर्णय प्रत्यक्ष गावात दिसले पाहिजेत आणि त्यासाठी प्रशासन मुख्यालयात राहून प्रत्यक्ष क्षेत्रात उतरले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, खासदार शोभा बच्छाव, आमदार राघवेंद्र भदाणे, आमदार मंजुळा गावित माजी केंद्रीय मंत्री डॉ. सुभाष भामरे, माजी आमदार कुणाल पाटील, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, अप्पर जिल्हाधिकारी संदीप पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार यांच्यासह प्रांताधिकारी, तहसिलदार, कृषी, सहकार, पशुसंवर्धन, उर्जा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

धुळे जिल्ह्यात हजारो लहान बंधारे वर्षानुवर्षे निष्क्रिय अवस्थेत आहेत. दगडी बांधकामाची दुरुस्ती, माती भरणे, आवश्यक ठिकाणी जाळी बसविणे अशा तुलनेने अल्प खर्चाच्या कामांतून हे बंधारे पुन्हा कार्यक्षम करता येऊ शकतात. मोठ्या खर्चाच्या नव्या कामांपेक्षा जुन्या जलसंधारण रचनांना पुन्हा जिवंत करण्याला प्राधान्य द्यावे, असे मंत्री श्री. बावनकुळे यांनी सांगितले. गावातलं पाणी गावात, शेतातलं पाणी शेतात, नाल्यातलं पाणी नाल्यात आणि शहरातलं पाणी शहरात जिरलं पाहिजे, या सूत्रावर जिल्ह्यात काम करावे. मोठ्या प्रमाणावर पुनर्भरण विहिरी व जलपुनर्भरण संरचना उभारून पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे बळकटीकरण केल्यास अनेक पाणीपुरवठा योजनांना दीर्घकालीन आधार मिळू शकतो, असे ते म्हणाले.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा नियोजन समितीच्या निधीचा वापरही नव्या प्राधान्यक्रमानुसार केला जाणार आहे. नागरी सुविधा, जनसुविधा, आदिवासी वस्ती किंवा दलित वस्ती अंतर्गत केवळ सिमेंट रस्त्यांवर खर्च करण्याऐवजी उपलब्ध निधी जलसंधारण, शेतरस्ते आणि पाणंद रस्त्यांकडे वळविण्यात येईल.

विविध योजनांच्या निधीचे एकत्रीकरण करून मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती करावी. शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण भागातील महिलांना स्थानिक पातळीवर काम मिळावे, यासाठी संबंधित विभागांनी संयुक्त आराखडा तयार करावा, असेही त्यांनी सांगितले.

दुष्काळाची तीव्रता पुढील काही महिन्यांत वाढू शकते, हे गृहीत धरून पशुधनासाठी आतापासूनच तयारी करण्याच्या सूचना देण्यात आल्या. ज्या भागात जमिनीत ओलावा आहे, तेथे ज्वारी, मका आणि स्थानिक परिस्थितीनुसार इतर चारा पिकांची लागवड वाढवावी. आवश्यकता भासल्यास पुढील दोन–तीन महिन्यांत ग्रामपंचायत स्तरावर चारा वितरण केंद्रे सुरू करता येतील, यासाठी नियोजन तयार ठेवावे. वन विभागाच्या जमिनीवरही चारा लागवड करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे श्री. बावनकुळे यांनी सांगितले.

पाणीपुरवठ्याशी संबंधित विभागांनी संभाव्य टंचाईग्रस्त गावांची यादी तयार करून विहिरी, कूपनलिका आणि इतर जलस्रोतांचे पुनर्भरण करण्याचे काम तातडीने हाती घ्यावे. शिवकालीन तसेच लहान–मोठ्या जुन्या बंधाऱ्यांची पाहणी करून कमी खर्चात पुनरुज्जीवन शक्य असलेल्या रचनांना प्राधान्य द्यावे. अशा प्रकारे अल्प खर्चातून मोठ्या प्रमाणावर पाणी साठवण क्षमता निर्माण केल्यास धुळे जिल्हा जलसंधारणाच्या बाबतीत आदर्श ठरू शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शेतकऱ्यांचा वीजपुरवठा खंडित होऊ नये यासाठी महावितरणने सुमारे १,००० रोहित्रांचा राखीव साठा उपलब्ध ठेवण्याचे नियोजन करावे. बिघाड झाल्यास तत्काळ रोहित्र बदलता आले पाहिजे, असे निर्देश त्यांनी दिले. वीजतारा आणि रोहित्र चोरीच्या घटनांविरोधातही कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. अशा चोरीमुळे सिंचन व्यवस्था विस्कळीत होऊन शेतकऱ्यांना मोठा आर्थिक आणि मानसिक फटका बसतो. त्यामुळे वारंवार चोरी करणाऱ्या टोळ्यांविरोधात कठोर प्रतिबंधात्मक कायदेशीर कारवाईचा विचार करावा, असे त्यांनी पोलिसांना सांगितले. अधिकाऱ्यांना मुख्यालय सोडता येणार नाही. दुष्काळी उपाययोजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे व्हायची असेल, तर संबंधित अधिकारी जिल्ह्यात आणि मुख्यालयात उपलब्ध असले पाहिजेत, असे श्री. बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

दुष्काळी उपाययोजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे व्हायची असेल, तर संबंधित अधिकारी जिल्ह्यात आणि मुख्यालयात उपलब्ध असले पाहिजेत, असे श्री. बावनकुळे यांनी स्पष्ट केले. दुष्काळाशी संबंधित ११ विभागांतील कोणताही अधिकारी जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय सुट्टी घेणार नाही किंवा जिल्ह्याबाहेर जाणार नाही. सर्व अधिकाऱ्यांनी मुख्यालयात राहून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवावे. शासन निर्णय घेईल; मात्र त्याची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासन गावात दिसले पाहिजे, असे ते म्हणाले. दौऱ्यादरम्यान नागरिकांकडून (पान २ वर)




# फळबागेला हवामानाचा फटका? विमा संरक्षणातून मिळणार आर्थिक आधार

# आंबा, केळी, डाळिंब व पपईसाठी हवामान जोखमींवर विमा कवच

**वेगवान वारा, अतिवृष्टी, अवेळी पाऊस आणि तापमानातील बदलापासून संरक्षण–जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सूरज जगताप**

धुळे (जिमाका) – शासकीय सेवा आणि योजनांचा लाभ अधिक प्रभावीपणे थेट नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या सेवा संकल्प अभियानाला कृषी क्षेत्राचीही जोड देण्यात आली आहे. त्याचाच एक भाग म्हणून धुळे जिल्ह्यात आंबिया बहार २०२६–२७ साठी पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजना राबविण्यात येत असून, आंबा, केळी, डाळिंब आणि पपई या फळपिकांना विविध हवामान धोक्यांपासून आर्थिक संरक्षण उपलब्ध करून देण्यात आले आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी निर्धारित मुदतीत या योजनेत सहभागी होऊन आपल्या फळबागेला विम्याचे संरक्षण द्यावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सूरज जगताप यांनी केले आहे.

कधी अवेळी पाऊस, कधी तापमानातील अचानक बदल, तर कधी अतिवृष्टी किंवा वेगवान वारा यामुळे फळबागांचे मोठे नुकसान होऊ शकते. फळपिकांमध्ये शेतकऱ्यांची आर्थिक गुंतवणूक तुलनेने अधिक असते आणि अपेक्षित उत्पादन न मिळाल्यास संपूर्ण हंगामाचे आर्थिक गणित बिघडू शकते. या जोखमीला आर्थिक आधार देण्यासाठी राज्य शासनामार्फत पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजना राबविण्यात येत आहे. आंबिया बहार २०२६–२७ अंतर्गत अधिसूचित फळपिकांसाठी पिकनिहाय हवामान धोके, विमा संरक्षणाचा कालावधी आणि विमा रक्कम निश्चित करण्यात आली आहे. निर्धारित हवामान निकष लागू झाल्यास योजनेच्या तरतुदीनुसार विमाधारक शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देय राहणार आहे.

आंब्यासाठी १.७० लाखांचे संरक्षण – आंबा पिकासाठी ६,८०० विमा हप्ता भरल्यास १ लाख ७० हजारांचे विमा संरक्षण मिळणार आहे. अवेळी पाऊस, कमी तापमान, जास्त तापमान आणि वेगवान वारा हे धोके यामध्ये समाविष्ट आहेत. गारपीट संरक्षणासाठी २,८५० विमा हप्त्यावर ५७ हजारांचे संरक्षण उपलब्ध आहे. या पिकासाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबर, २०२६ आहे.

केळीसाठी १.७० लाखांचे विमा कवच – केळी पिकासाठी ८,५०० विमा हप्ता असून १ लाख ७० हजारांचे संरक्षण मिळणार आहे. कमी तापमान, जास्त तापमान आणि वेगवान वारा या हवामान धोक्यांचा यात समावेश आहे. गारपीट संरक्षणासाठी स्वतंत्र पर्यायही उपलब्ध आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर, २०२६ आहे. डाळिंबाला १.६० लाखांपर्यंत संरक्षण – डाळिंब पिकासाठी ६,४०० विमा हप्ता भरल्यास १ लाख ६० हजारांचे विमा संरक्षण मिळणार आहे. अवेळी पाऊस, जास्त तापमान आणि अतिवृष्टी हे धोके यात समाविष्ट आहेत. गारपीट




संरक्षणासाठी २,६५० विमा हप्त्यावर ५३ हजारांचे संरक्षण मिळू शकते. अर्ज करण्याची अंतिम मुदत १४ जानेवारी, २०२७ आहे. पपईसाठी कमी हप्त्यात संरक्षण – पपई पिकासाठी ३,४०० विमा हप्ता असून ४० हजारांचे विमा संरक्षण उपलब्ध आहे. कमी तापमान, वेगवान वारा, अतिवृष्टी आणि आर्द्रता हे हवामान धोके या योजनेत समाविष्ट करण्यात आले आहेत. गारपीट संरक्षणासाठी ६५० विमा हप्त्यावर १३ हजारांचे संरक्षण मिळणार असून अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर, २०२६ आहे. अंतिम मुदतीपूर्वी अर्ज पूर्ण करा – या योजनेअंतर्गत महसूल मंडळ हा विमा घटक निश्चित करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित अधिसूचित महसूल मंडळातील पात्र शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून निर्धारित मुदतीत ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे. हवामानातील अनिश्चितता रोखता येत नसली, तरी त्यातून उद्भवणारी आर्थिक जोखीम निश्चितच कमी करता येऊ शकते. त्यामुळे आंबा, केळी, डाळिंब आणि पपई उत्पादक शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता योजनेत सहभागी व्हावे आणि आपल्या फळबागेला आर्थिक संरक्षणाचे कवच द्यावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सूरज जगताप यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# माता–बाल आरोग्यापासून कर्करोग तपासणीपर्यंत; ग्रामीण भागात ४८१ शिबिरांचा आरोग्यसेवा विस्तार

धुळे (जिमाका) – माता–बाल आरोग्य, कुपोषणाचे वेळेवर निदान, उच्च रक्तदाब व मधुमेह तपासणी, कर्करोगासारख्या गंभीर आजारांची चाचणी आणि गरजू रुग्णांना पुढील उपचारासाठी संदर्भ सेवा अशा विविध आरोग्य उपक्रमांनी सेवा संकल्प अभियानाला धुळे जिल्ह्यात व्यापक स्वरूप मिळाले आहे. जिल्हा परिषद धुळेच्या आरोग्य विभागामार्फत १७ ते ३० सप्टेंबर २०२६ या अवघ्या १४ दिवसांत जिल्हाभर ४८१ आरोग्य तपासणी शिबिरे घेण्यात आली असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके यांनी दिली. सेवा संकल्प अभियान १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येत असून, त्याअंतर्गत गर्भवती माता आणि बालकांच्या आरोग्याला विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाच्या माध्यमातून ८२ विशेष शिबिरे आयोजित करण्यात आली. या शिबिरांमध्ये गर्भवती मातांची वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तपासणी करण्यात आली. रक्त तपासणीसह मधुमेह, रक्तदाब, एचआयव्ही, कावीळ आदी विविध तपासण्या करण्यात आल्या. तपासणीत रक्तक्षय आढळून आलेल्या मातांना आवश्यक उपचार देऊन पुढील वैद्यकीय सेवेसाठी संदर्भित करण्यात आले. बालकांमधील कुपोषणाचे लवकर निदान व्हावे, यासाठी अंगणवाडीतील ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील बालकांची समुदाय आरोग्य अधिकारी (सीएचओ) तसेच आरबीएसके पथकांमार्फत तपासणी करण्यात येत आहे. त्यामुळे बालकांच्या आरोग्य स्थितीतील जोखीम वेळेत ओळखून आवश्यक उपचार उपलब्ध करून देण्यास मदत होत आहे. अभियानांतर्गत आयोजित आरोग्य शिबिरांमध्ये उच्च रक्तदाब, मधुमेह, तोंडाचा कर्करोग तसेच गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगासह विविध आजारांची तपासणी



करण्यात आली. तपासणीदरम्यान आजाराचे निदान झालेल्या किंवा पुढील उपचाराची आवश्यकता असलेल्या लाभार्थ्यांना उच्चस्तरीय उपचारासाठी संदर्भित करण्यात आले. त्यामुळे केवळ तपासणीवर न थांबता निदानापासून पुढील उपचारापर्यंतची आरोग्यसेवा साखळी अधिक परिणामकारकपणे जोडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. याच कालावधीत प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये प्रसूती झालेल्या मातांच्या ४७ नवजात बालकांचे जन्म दाखलेही वितरित करण्यात आले. आरोग्य सेवेसोबतच आवश्यक कागदपत्रे नागरिकांना वेळेत उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न यामधून करण्यात आला. अभियानाच्या उर्वरित कालावधीतही जिल्हाभर आरोग्य तपासणी, उपचार, संदर्भ सेवा तसेच आरोग्य जनजागृतीचे उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार आहेत. नागरिकांनी आपल्या परिसरात आयोजित करण्यात येणाऱ्या आरोग्य शिबिरांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन उपलब्ध तपासणी व उपचार सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये केले आहे.

(पान १ वरून) दुष्काळी उपाययोजनांचे...

प्राप्त झालेल्या सुमारे १४० निवेदनांवर स्वतंत्र कार्यवाही करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. तहसील, प्रांत, भूमी अभिलेख तसेच इतर विभागांशी संबंधित या निवेदनांचा जिल्हाधिकारी स्वतः आढावा घेणार असून, प्रत्येक प्रकरण अंतिम निष्कर्षापर्यंत नेण्याची जबाबदारी जिल्हा प्रशासनावर सोपविण्यात आली आहे. कर्जमाफीच्या प्रक्रियेत जिल्ह्यातील सुमारे ७,००० पात्र शेतकऱ्यांची आवश्यक पडताळणी अपूर्ण असल्याने त्यांना लाभ मिळू शकलेला नाही, असे बैठकीत निदर्शनास आले. शासनाने मंजूर केलेला लाभ केवळ तांत्रिक कारणामुळे अडकून राहू नये, यासाठी संबंधित यंत्रणांनी गावात जाऊन आवश्यक पडताळणी पूर्ण करण्याची मोहीम राबवावी, असे निर्देश देण्यात आले. त्याचबरोबर जवळपास ६,००० शेतकरी ॲग्रिस्टॅक नोंदणीबाहेर असल्याने त्यांना नोंदणीच्या कक्षेत आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. शेतकऱ्यांची नोंद अचूक आणि अद्ययावत झाल्यास मदत, पीकविषयक माहिती आणि विविध योजनांचा लाभ अधिक नेमकेपणाने देता येईल, असे बैठकीत नमूद करण्यात आले.

पीक पाहणीच्या संगणकीय प्रक्रियेत शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणींचीही दखल घेण्यात आली. आवश्यकतेनुसार प्रत्यक्ष नोंद व पाहणीच्या पद्धतीचा पर्याय उपलब्ध करून देता येईल का, यावर शासन स्तरावर विचार सुरू असल्याचे महसूल मंत्र्यांनी सांगितले. बैठकीत दुष्काळ, पाणी, चारा, वीज, कृषी, शेतरस्ते, सिंचन, कर्जमाफी, पीक पाहणी आणि रोजगार यांसह सुमारे ३४ ते ३५ महत्त्वाच्या प्रश्नांवर चर्चा झाली. लोकप्रतिनिधींनी मांडलेल्या सूचनांचीही अंमलबजावणी करण्याचे आश्वासन देण्यात आले. मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार दुष्काळ निवारणासाठी महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापन करण्यात आली असून, धुळे जिल्ह्यातून पुढे आलेल्या व्यवहार्य सूचना शासनस्तरावर प्राधान्याने विचारात घेतल्या जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.

राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पांची क्षमता पूर्णपणे उपयोगात आणण्यावर भर दिला. जिल्ह्यात उपलब्ध सिंचन सुविधा, प्रकल्पांमधील पाणीसाठा आणि त्याचा प्रत्यक्ष लाभ किती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतो, याचे काटेकोर नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. ॲग्रिस्टॅकवरील शेतकऱ्यांची नोंद, पीकस्थिती आणि उपलब्ध कृषी माहिती विचारात घेऊन मदतीचे नियोजन अधिक अचूक करावे, जेणेकरून पात्र शेतकरी तांत्रिक कारणामुळे वंचित राहणार नाही, असे त्यांनी सांगितले. दुष्काळी उपाययोजना, पाणी, चारा, रोजगार, सिंचन आणि शेतकरीहिताच्या निर्णयांची अंमलबजावणी वेळेत होत आहे की नाही, यासाठी दर गुरुवारी जिल्हा प्रशासनाच्या कामकाजाचा नियमित आढावा घेण्यात येईल, असेही पालकमंत्री श्री. रावल यांनी स्पष्ट केले.

# वीरांगना राणी दुर्गावतींच्या स्मृतीला कर्तृत्वाचा सलाम; आदिवासी महिलांच्या हातात स्वावलंबनाची नवी ताकद







धुळे (जिमाका) – शासनाच्या योजना केवळ कागदावर न राहता त्या थेट लाभार्थ्यांच्या हातात पोहोचाव्यात, महिलांच्या कर्तृत्वाला अर्थबळ मिळावे आणि आदिवासी कुटुंबांच्या स्वावलंबनाचा मार्ग अधिक भक्कम व्हावा, या सेवा संकल्प अभियानाच्या भूमिकेला आज धुळ्यात प्रत्यक्ष कृतीची जोड मिळाली. वीरांगना राणी दुर्गावती यांच्या जयंतीनिमित्त एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धुळे यांच्या वतीने आयोजित आदिवासी महिला बचत गट मेळाव्यात महिला सक्षमीकरण, स्वयंरोजगार आणि गुणवंत विद्यार्थ्यांच्या प्रोत्साहनाचा अनोखा संगम पाहायला मिळाला. मेळाव्यात १०० आदिवासी महिला बचत गटांना प्रत्येकी १० हजार याप्रमाणे एकूण १० लाखांचा निधी सशक्तीकरणासाठी वितरित करण्यात आला. त्याचबरोबर सन २०२५-२६ च्या न्यूक्लिअस बजेटअंतर्गत विविध योजनांमधून ३० पात्र लाभार्थ्यांना एकूण ३५ लाखांच्या लाभांचे वाटप करण्यात आले. आर्थिक मदतीबरोबरच महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी विविध व्यवसायाभिमुख योजनांची माहितीही देण्यात आली. आदिवासी भागातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशाचाही या कार्यक्रमात गौरव करण्यात आला. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धुळे अंतर्गत शासकीय व अनुदानित आश्रमशाळांतील सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील दहावी व बारावी परीक्षेत राज्य, विभाग आणि प्रकल्पस्तरावर प्रावीण्य मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना राणी दुर्गावती गुणवंत प्रोत्साहनपर बक्षीस योजनेंतर्गत पारितोषिके आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. महिलांसाठी रोजगाराची दारे अधिक व्यापक करण्याच्या दृष्टीने राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण योजनेतून वैयक्तिक व्यवसायासाठी प्रत्येकी ५० हजार, तर सामूहिक व्यवसायासाठी प्रत्येकी ७ लाख ५० हजारांचे विशेष अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. ग्रामीण भागातील महिलांसाठी तंत्रज्ञानाधारित उत्पन्नाचे पर्यायही मेळाव्यात अधोरेखित झाले. बोटॅनिकल गार्डन व शेतमाल प्रक्रिया अंतर्गत सौर वाळवणी संचासाठी डाबरीमाळा महिला बचत गट, वाडी बु., ता. शिरपूर यांना ५ लाख ५० हजारांचे १०० टक्के अनुदान देण्यात येणार आहे. शिवणकामाचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांना शिलाई मशीन खरेदीसाठी प्रत्येकी ९ हजार ९५० रुपयांचे अर्थसहाय्य, तर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून **(पान ४ वर)**

# ओमप्रकाश अग्रवाल म्हणजे विविध क्षेत्रांतील यशस्वी भीष्म पितामह महसूलमंत्री बावनकुळे : अमृतमहोत्सवानिमित्त ११ शेतकऱ्यांना गोदान

धुळे– ओमप्रकाश अग्रवाल यांच्या अमृतमहोत्सवातही अग्रवाल कुटुंबाने दुष्काळी स्थितीचे समाजभान राखत शेतकऱ्यांप्रती आपली संवेदनशीलता दाखवून दिली. ११ शेतकऱ्यांना वासरांसह दुभत्या गायींचे दान करतानाच त्यांनी शासनाच्या दुष्काळ निधीसाठी ११ लाखांचा धनादेश देण्याचे जाहीर केले. ओपीजी हे शहराच्या सामाजिक, राजकीय, सहकार, आध्यात्मिक, उद्योग क्षेत्रातले भीष्म पितामह आहेत. त्यांचा जीवनप्रवास संघर्षशील राहिला. राष्ट्रवादाची प्रेरणा घेत त्यांची जनसंघ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघापासून सुरू झालेली वाटचाल भारतीय जनता युवा मोर्चा आणि भाजपमधील विविध जबाबदाऱ्यांनी युक्त आहे. समाजातील शेवटच्या व्यक्तीच्या उन्नतीसाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले, असे प्रतिपादन राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

भाजपचे ज्येष्ठ नेते तथा ज्येष्ठ उद्योजक ओमप्रकाश अग्रवाल यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त रविवारी (ता. ४) येथील खान्देश गोशाळेच्या मैदानावर ओपी शेट यांचा सन्मान, भजनसंध्या, भक्तिमय गीतगायन, शेतकऱ्यांना गोदानाचा कार्यक्रम झाला, त्यावेळी अध्यक्षस्थानावरून श्री. बावनकुळे बोलत होते. यावेळी केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, सत्कारमूर्ती अग्रवाल, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, खासदार स्मिता वाघ, खासदार डॉ. शोभा बच्छाव, आमदार सर्वश्री अमरिशभाई पटेल, मंगेश चव्हाण, नंदकिशोर महाजन, काशिराम पावरा, माधवी नाईक, रोहिणी नायडू, मंजुळा गावित, राहुल ढिकले, राम भदाणे, अमोल जावळे, राजेश पाडवी, लक्ष्मण सावजी, महापौर मायादेवी परदेशी, माजी केंद्रीय मंत्री डॉ. सुभाष भामरे, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, माजी आमदार कुणाल पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा धरती देवरे, भाजपचे धुळे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, माजी जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी प्रमुख पाहुणे होते.





श्री. बावनकुळे म्हणाले, की सर्वप्रथम धुळे शहरवासीयांपुढे नतमस्तक होतो, की तुम्ही सर्वांनी अनुपभैया अग्रवाल यांच्या रूपाने हिरा कार्यकर्त्याला विधानसभेत पाठविले. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारमध्ये उत्कृष्ट काम **(पान ४ वर)**

# ज्येष्ठांच्या अनुभवातून समाजाला नवी दिशा मिळते-डॉ. संजय सुराणा

## एच.आर.पटेल कला व महिला महाविद्यालयात ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्यशाळा संपन्न





शिरपूर - ज्येष्ठ नागरिकांचा अनुभव, ज्ञान, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रीय समर्पण यांना योग्य सन्मान मिळणे गरजेचे आहे. त्यांच्या अनुभवातून समाजाला दिशा मिळते, असे प्रतिपादन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. संजय सुराणा यांनी केले. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि एच. आर. पटेल कला व विज्ञान महिला महाविद्यालय, शिरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेला ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी शिरपूर एज्युकेशन सोसायटीच्या सचिव सौ. रेषा पटेल, कमलकिशोर भंडारी, प्राचार्य डॉ. संजय सुराणा, डॉ. मोहनदास भामरे, श्रीमती आशाताई रंधे, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अनिल पाटील, उपाध्यक्ष के. एम. राजपूत, प्राचार्य डॉ संजय बारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गजानन पाटील उपस्थित होते. कार्यशाळेच्या समन्वयिका डॉ. इंदिरा गिरासे यांनी प्रास्ताविकातून कार्यशाळेची भूमिका व उद्दिष्टे स्पष्ट केली. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपस्थित अतिथींचा सत्कार करण्यात आला. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन टिचर्स वेलफेयर एसोसिएशन, चेन्नई यांचे पुढाकाराने अमेरिकेतील जागतिक पर्यावरण विद्यापीठ यांचे तर्फे डॉ. मोहनदास भामरे यांना मानद डी.लिट. पदवी प्राप्त झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.

प्राचार्य डॉ. गजानन पाटील यांनी स्वागतपर मनोगतात शिरपूर एज्युकेशन सोसायटीच्या सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्याबद्दल माहिती दिली. संस्थेचे अध्यक्ष आमदार अमरीशभाई पटेल, भूपेशभाई पटेल, राजगोपाल भंडारी, सचिव सौ. रेषा पटेल यांच्या मार्गदर्शनामुळे संस्थेच्या कार्याला नवी दिशा मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. सदर कार्यक्रम महाविद्यालयाला पुरस्कृत केल्याबद्दल विद्यापीठाचे विशेष आभार मानले. प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ. संजय सुराणा यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या त्याग व समर्पणामुळे आजची पिढी घडल्याचे नमूद केले. ज्येष्ठ नागरिक म्हणजे अनुभवाची शिदोरी, त्यागाची गाथा आणि संस्कारांची सावली आहे. वय वाढते म्हणून स्वप्ने संपत नाहीत. नव्या पर्वात प्रवेश केल्याचा आत्मविश्वास ठेवून भजन, चिंतन आणि आनंदाने जीवनाचा हा टप्पा जगावा, असे आवाहन त्यांनी केले. ज्येष्ठांचा सन्मान म्हणजे संस्कारांसह भविष्याचा सन्मान असल्याचेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ. रेषा पटेल यांनी आजी-आजोबांचे प्रेम, अनुभव आणि संस्कार यामुळे जीवनाला योग्य दिशा मिळत असल्याचे सांगितले. ही जीवनमूल्ये पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे ही सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. युवा पिढी, पालक आणि ज्येष्ठ नागरिक यांच्यात संवाद निर्माण करणारे उपक्रम समाजाला अधिक समृद्ध करतात, असेही त्यांनी सांगितले.

याप्रसंगी अतिथींमधून कमलकिशोर भंडारी तसेच ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अनिल पाटील याने मनोगतपर शुभेछ्या व्यक्त केल्या. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात डॉ. मोहनदास भामरे यांनी 'मनाचे ब्युटी पार्लर' या विषयावर मार्गदर्शन केले.यात त्यांनी संवादात्मक शैलीतून मनाचे ब्यूटी पार्लर हा विषय अतिशय मनोरंजक स्वरूपात प्रत्यक्ष जीवनातील सुंदर अनुभवांची गुंफण आणि आठवणींचा मागोवा-रमणीय जीवनाचा आलेख अतिशय विनोदी पद्धतीने मांडला. मनाला मोकळीक दिली पाहिजे आणि सुखी जीवनाचा मंत्र म्हणजे- विनम्रता, आनंदी जीवन असे सांगत मनाच्या दुःखी विचारांना ड्रेनेज असायलाच पाहिजे असे प्रतिपादन केले. दुसऱ्या सत्रात डॉ. दर्शन राखेचा आणि डॉ. मोनल चोरडिया यांनी 'निरोगी, आनंदी वृद्धापकाळ' या विषयावर मार्गदर्शन केले. शारीरिक आरोग्यासोबत मानसिक आनंद, सकारात्मक विचार आणि सामाजिक सहभाग यांना ज्येष्ठांनी प्राधान्य द्यावे, असे त्यांनी सांगितले. तिसऱ्या सत्रात 'खेळ, मनोरंजन, अनुभवातील सुंदर जीवन' या उपक्रमांतर्गत विविध मनोरंजक खेळ व उपक्रम घेण्यात आले. डॉ. इंदिरा गिरासे यांच्या नियोजनातून आयोजित या उपक्रमांना ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनानुभवाचा सन्मान करत त्यांना आनंदी, निरोगी आणि सक्रिय जीवन जगण्यासाठी प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न या कार्यशाळेतून करण्यात आला. विविध उपक्रमांमुळे सहभागी ज्येष्ठ नागरिकांमध्ये उत्साह आणि नवचैतन्य निर्माण झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तथा आभार प्रदर्शन डॉ. विद्या पाटील यांनी केले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

(पान ३ वरून)

### वीरांगना राणी दुर्गावतींच्या

मोटार मेकॅनिकचे प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थींना गॅरेज व्यवसाय सुरू करण्यासाठी ५० हजारांचे अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. कार्यक्रमस्थळी विविध शासकीय विभागांनी माहितीपर दालने उभारली होती. महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तू, उत्पादने आणि उपक्रमांचेही स्वतंत्र दालन उभारण्यात आले. त्यामुळे मेळावा केवळ लाभवाटपापुरता मर्यादित न राहता योजनांची माहिती, रोजगाराच्या संधी आणि बाजारपेठेशी जोडणारा संवादमंच ठरला. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या महिला बचत गटांचा यावेळी गौरव करण्यात आला. त्यांच्या यशोगाथांमधून इतर महिला बचत गटांनाही व्यवसाय, उत्पादन आणि आर्थिक स्वावलंबनासाठी प्रेरणा मिळावी, हा यामागील उद्देश होता. सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून लाभार्थ्यांपर्यंत योजना प्रभावीपणे पोहोचविण्याबरोबरच त्यांच्या क्षमतांना संधी देण्याचा हा प्रयत्न ठरला. कार्यक्रमास आमदार काशीराम पावरा, आमदार मंजुळाताई गावित, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रवींद्र सोनवणे, प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील, सहाय्यक प्रकल्प अधिकारी पवन सोनुने यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी-कर्मचारी, महिला बचत गटांच्या प्रतिनिधी आणि लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

(पान ३ वरून)

### ११ शेतकऱ्यांना गोदान

करणारे आमचे जे १० आमदार आहेत त्यातील एक अनुपभैया आहेत. धुळे शहराचे जेही प्रश्न, समस्या आहेत ते सोडविण्यासाठी ते सतत पाठपुरावा करत असतात. आम्हीही त्यांना सहकार्य करत आहोत. आजही ओपीजींनी विधानसभा निवडणुकीत अनुपभैयांनी शहरवासीयांना जी-जी वचने दिली ती पूर्ण करण्यासाठी सरकारने त्यांच्या पाठीशी राहण्याचे आवाहन केले. मी धुळेकरांसमोर जाहीर करतो, की अनुपभैयांनी शहर विकासासाठी मागितलेले प्रत्येक काम राज्य सरकार पूर्ण करेल.

पालकमंत्री रावल म्हणाले, की आई-वडिलांमध्येच देव असतो या भावनेतून आमदार अनुपभैया अग्रवाल यांनी आपल्या वडिलांचा अमृतमहोत्सवाचा अप्रतिम सोहळा घडवून आणला. ओपी शेट यांनी अत्यंत कष्टातून, संघर्षातून जीवनाची वाटचाल केली. जनसंघ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक आणि नंतर भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष, भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष म्हणून त्यांनी जबाबदारी निभावली. विविध आंदोलनांतून भाजपची पाळेमुळे या जिल्ह्यात रोवली. त्यांच्याच संस्कारांतून घडलेल्या अनुपभैयांनी दुष्काळी स्थितीचे समाजभान राखत आज वडिलांप्रती ऋण व्यक्त करताना त्यांच्या अमृतमहोत्सवासाठी जमविलेला गोतावळा सर्वांसाठी अभिमानास्पद आहे. ओपी शेट यांना दीर्घायुष्याच्या शुभेच्छा.

जलसंपदामंत्री महाजन म्हणाले, की ओपी शेट यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवस हा त्यांच्या ७५ वर्षांच्या संघर्षाचा, संस्कारांचा आणि समाजसेवेचा दीर्घ प्रवास आहे. जिंदगी लंबी नही बडी होनी चाहिए याची प्रचिती ओपी शेट यांच्या जीवनप्रवासातून येते. तुम्ही किती वर्षे जगला यापेक्षा कसे जगलात याला जास्त महत्त्व असते. तुम्ही समाजासाठी, गोरगरीब गरजूंसाठी, धर्मासाठी, राष्ट्रासाठी काय योगदान दिले हे महत्त्वाचे ठरते. ओपी शेट यांचा जीवनपट संघर्षशील असून, त्यांनी नेहमीच सामाजिकतेचे भान राखत जीवनप्रवास केला. त्यांचा जनसंघ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भाजपमधील योगदान पाहता ते आजही आमच्यासाठी मार्गदर्शक आहेत. राजकारण, समाजकारण, उद्योग, शिक्षण, सहकार, अर्थकारण आदी क्षेत्रांत वावरताना त्यांनी गोरगरीब, सामान्य जनतेसाठी कार्य केले. माणसे जोडली. अनुपभैयांच्या रूपाने त्यांच्या कुटुंबातून एक चांगला लोकप्रतिनिधी शहराला लाभला. ओपीजींनी त्यांना चांगले संस्कार दिले. ३०० सदस्यांचा हा परिवार आजही एकसंध आहे, याचे सारे श्रेय ओपीजींना आहे. अशा व्यक्तिमत्त्वास वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा देतो.

आमदार अग्रवाल म्हणाले, की ओमप्रकाश अग्रवाल यांच्या अमृतमहोत्सवाचे औचित्य साधत महसूलमंत्री बावनकुळे यांनी मोठी भेट दिली आहे. आपल्या सर्वांचे ४० वर्षांपासूनचे एमआयडीसी विस्तारीकरणाचे जे स्वप्न होते ते पूर्ण झाले आहे. त्यांनी आज रावेर एमआयडीसीसाठी २००० एकर जागा मंजूर केली आहे. यामुळे शहराच्या औद्योगीकरणाला मोठी चालना मिळणार असून, या एमआयडीसीत स्थानिक कुशल-अकुशल मनुष्यबळाला रोजगाराच्या मोठ्या संधी प्राप्त होणार आहेत. या निर्णयासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री जयकुमार रावल यांच्यासह संपूर्ण मंत्रिमंडळाचे शतशः आभार मानतो.

**हे मराठी साप्ताहिक, प्रकाशक संजय अण्णा कुसळकर यांनी मुद्रक अब्दुल मलिक मोहम्मद शरीफ अन्सारी यांच्या न्यू शार्प ऑफसेट प्रिंटर्स, अप्सरा हॉटेल, नवीन बस स्टॅण्ड समोर, मालेगांव, जि. नाशिक येथे छापून सा. 'प्रजा न्याय' कार्यालय - घर नं. २६, चक्करबर्डी, शासकीय दूध डेअरी रोड, पाण्याच्या टाकीजवळ, धुळे - ४२४ ००१ येथून प्रकाशित केले आहे. संपादक, मालक, संजय अण्णा कुसळकर - भ्रमणध्वनी - ९४२२७९८०९३ / ९०२८१३६९५३. Email - kusalkars@gmail.com / prajanyay@gmail.com (कायदेशीर सल्लागार - ॲड. उमेश विठ्ठल सुर्यवंशी)**

**(या वृत्तपत्रातील लिखानाशी मालक/प्रकाशक/संपादक सहमत असतीलच असे नाही.) (कोणताही वाद धुळे न्यायालयांतर्गत)**